**विंधण विहिरीचा कार्यक्रम**
**राबविण्यासाठी मार्गदर्शक सूचना**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक क्र. ग्रापापु- १००१/ प्रक्र-४३६/ पापु-०७,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक :- २० नोव्हेंबर, २००१.**

**पहा :-** १) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. ग्रापापु-१०००/ प्रक्र-१०७ (१)/ पापु-०७, दिनांक १४/११/२०००.

२) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. ग्रापापु-१००१/ प्रक्र-२५० / पापु-०७, दिनांक ३१/३/२००१.

३) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. ग्रापापु-१००१/ प्रक्र-२५०/ पापु-०७, दि.३१.१०.२००१.

**शासन परिपत्रक :-**

विंधण विहिर कार्यक्रम हा महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १०० अन्वये जिल्हा परिषदांकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे. हा कार्यक्रम राबविण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना संदर्भीय शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या आहेत. विंधण विहिर कार्यक्रमांतर्गत टंचाईचा कार्यक्रम हा आतापर्यंत जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिकांकडून राबविण्यात येत होता. परंतु आता विंधण विहिर कार्यक्रम हा जिल्हा परिषदांकडे हस्तांतरीत करण्यात आला असल्याने या कार्यक्रमांतर्गत टंचाई कार्यक्रमही जिल्हा परिषदांकडे सोपविण्यात आला आहे. विंधण विहिर कार्यक्रमांतर्गत टंचाईचा कार्यक्रम राबविण्यासाठी शासन पुढील प्रमाणे मार्गदर्शक सूचना देत आहे:-

१) विंधण विहिर कार्यक्रमांतर्गत टंचाईच्या कार्यक्रमासाठी आवश्यक सर्वेक्षण जिल्हा परिषदांनी त्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या भूवैज्ञानिकांकडून करुन घ्यावे.

२) टंचाईच्या कार्यक्रमाची व्याप्ती पहाता तो जिल्हा परिषदांमधील उपलब्ध भूवैज्ञानिकांकडून, विहित कालावधीत पूर्ण करुन घेणे शक्य नसल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची खात्री झाल्यास त्यांनी तसे तात्काळ संबंधित जिल्हाधिका-यांनी कळवावे.

३) जिल्हाधिका-यांनी टंचाईच्या कार्यक्रमाची व्याप्ती/ तीव्रता विचारात घेऊन विंधण विहिरींच्या टंचाईच्या कामाच्या सर्वेक्षणासाठी जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालयातील भूवैज्ञानिकाच्या सेवा, वाहने व वाहन चालक यांच्यासह अधिग्रहीत कराव्यात व त्यांच्या सेवा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

४) संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा यांनी त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या भूवैज्ञानिकांकडून विंधण विहिरींचा टंचाई अंतर्गत सर्वेक्षणाची कामे कालबध्द कार्यक्रम आखून पूर्ण करावीत.



883

५)	मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी, त्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या विंधण यंत्राकडून विंधणाचे जास्तीत जास्त काम करुन घ्यावे या शिवाय त्यांना हा कार्यक्रम पूर्ण करण्यासाठी खाजगी विंधण यंत्रे भाडयाने लावण्याची आवश्यकता वाटल्यास तशी ती त्यांना लावता येतील. त्यासाठी खाजगी कंत्राटदारांची यादी संचालकांनी सर्व जिल्हा परिषदांना तात्काळ उपलब्ध करुन द्यावी.

६)	संचालकांनी उपलब्ध करुन दिलेल्या यादीतील कंत्राटदारांबरोबर संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी वाटाघाटी करुन जे कंत्राटदार शासन मान्य दरापेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असतील त्यांना प्राधान्य देण्यात यावे. परंतु कोणत्याही परिस्थितीत शासन मान्य दरांपेक्षा अधिक दर देता येणार नाहीत.

७)	जिल्हा परिषदांकडे वर्ग केलेल्या कनिष्ठ भूवैज्ञानिकांची बरीच पदे रिक्त आहेत. सदर सर्व रिक्त पदे संचालकांनी त्यांच्या कडील पदांमधून पुढील १५ दिवसात प्राधान्याने भरावीत.

८)	ज्या जिल्हयांमध्ये खाजगी कंत्राटदार विंधणाच्या कामासाठी जाणार नाहीत त्या जिल्हयात संचालक भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांच्याकडे असलेल्या ११ विंधण यंत्रापैकी आवश्यक विंधण यंत्रापैकी आवश्यक विंधण यंत्रे प्रतिनियुक्तीवर पाठवावीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

**(बी. सी. खटुआ)**
**शासनाचे सचिव**

**प्रति,**
मा.मंत्री (पा.पु.व.स्व.) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (पा.पु.व.स्व.) यांचे खाजगी सचिव
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
महालेखापाल, महाराष्ट्र -१, मुंबई (लेखापरीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखापरीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे.
सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
सर्व जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी,
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासन
निवडनस्ती, पापु०७



४४४